# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३७

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ६/१२/२०१६** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. १८०५**

रस्त्यावरील टी जंक्शनचा विकास व सुधारणा व वाहनतळ निर्माण करणे भाग–३ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रविण कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९८,६७६/– पेक्षा २७.२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७२,७२,०३७=०५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीवरील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्याकरीता त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/८१७ दि. २९/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १८०६**

रस्त्यावरील टी जंक्शनचा विकास व सुधारणा व वाहनतळ निर्माण करणे भाग–१ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रविण कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९८,६७६/– पेक्षा २७.२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७२,७२,०३७=०५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीवरील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्याकरीता त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/८२० दि. २९/११/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १८०७**

परिमंडळ क्र. २ मधील बायोगॅस प्रकल्पावर स्थापत्यविषयक दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.योगेश्वर असोसिएटस् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९४,३८०/– पेक्षा २५.५४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७४,४१,८१५=३४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सामान्य भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस व कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घन व्यव./८४० दि.२९/११/२०१६ चे पत्र.

### एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्र. १८०८**

प्रभाग क्र. ५९ ब पुणे पेठ भवानी न्यू टिंबर मार्केट प्लॉट नं. १२७ क पैकी ८४.८ चौ.मी. येथे मिश्र कचरा विलगीकरण प्रकल्प उभारणे व चालविणेसाठी कामगारांची व्यवस्था करणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार एस.पी.एन्टरप्रायजेस यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून र.रु.७,९५,०००/– व मासिक देखभाल दुरुस्तीसाठी र.रुपये १,४४,००/– असून तीन वर्षासाठी (३६ महिने साठी) र.रुपये५१,८४,०००/– असे एकूण मिळून र.रुपये ५९,७९,०००/– (सर्व करांसहित) काम करणेस त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घन.व्यव/७८८ दि. २८/११/२०१६ चे पत्र.

### मागील सभेचे विषय

**विषय क्र. १८०९**

मा.सौ.मिनल सरवदे व मा.सौ.सुमन पठारे यांचे दि.१७/१०/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र १७ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, शहरामध्ये बी.आर.टी.मार्ग विकसित करणे, पान क्र. १९६, अ.क्र. २, वारजे ते खराडी १७.८० कि.मी. बी.आर.टी. मार्गाची कामे करणे | २ कोटी | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) प्रभाग क्र. १७ अ मधील कल्याणीनगर येथे गलांडे उद्यान व परिसरामध्ये विविध विकास कामे करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. १७ अ मधील शरद उद्यान परिसरामधील फुटपाथ करणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र. १७ अ मधील शास्त्रीनगर-त्रिदलनगर परिसरामधील रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र. १७ अ मधील शास्त्रीनगर, शांतीरक्षक परिसरातील ड्रेनेज लाईन बदलणे व काँक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र. १७ अ मधील कल्याणीनगर-शास्त्रीनगर परिसरामध्ये फुटपाथ करणे | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र. १७ अ मधील विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| ७) प्रभाग क्र. १७ अ मधील कल्याणीनगर-शास्त्रीनगर परिसरामध्ये प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करणे | --- | १० लाख |
| ८) प्रभाग क्र. १७ अ मधील त्रिदलनगर परिसरातील विद्युत विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| ९) प्रभाग क्र. १७ अ मधील विविध ठिकाणी चॅम्पीयन मशिनने ड्रेनेज लाईन साफ करणे | --- | १० लाख |
| १०) प्रभाग क्र. १७ अ मधील नीता पार्क-त्रिदलनगर परिसरात काँक्रीट करणे व ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| ११) प्रभाग क्र. १७ अ मधील विविध ट्रिमिक्स काँक्रीट करणे | --- | १० लाख |
| १२) प्रभाग क्र. १७ अ मधील विविध ठिकाणी पाण्याच्या लाईन्स टाकणे व काँक्रीट करणे | --- | १० लाख |
| १३) प्रभाग क्र. १७ अ मधील नीता पार्क व आगाखान पॅलेस परिसरामधील रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| १४) प्रभाग क्र. १७ अ मधील काँक्रीट रस्त्याचे उर्वरित कामे करणे | --- | १० लाख |
| १५) प्रभाग क्र. १७ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| १६) प्रभाग क्र. १७ अ मधील विविध ठिकाणी बेंचेस बसविणे | --- | १० लाख |
| १७) प्रभाग क्र. १७ अ मधील लायब्ररीमध्ये पुस्तके पुरविणे | --- | ५ लाख |
| १८) प्रभाग क्र. १७ अ मधील जुने शौचालय पाडून नविन शौचालय बांधणे | --- | १५ लाख |
| १९) प्रभाग क्र. १७ अ मधील विविध ठिकाणी विविध विकास कामे करणे | --- | १० लाख |
| २०) प्रभाग क्र. १७ अ मधील विविध आकाराच्या बकेट व ढकलगाडया पुरविणे | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८१०**

पुणे पेठ मौजे खराडी स.नं. ६३/१/२, ६३/१/३, ६३/१/४, ६३/१/५ येथील ३० मी.डी.पी.रस्त्याचे ८५४१.७७ चौ.मी. क्षेत्र टी.डी.आर./एफ.एस.आय देणेपोटी मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत दि. १७/१/२०१३ व दि. २९/८/२०१६ रोजी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आलेले असून ७/१२ सदरी दि. २४/५/२०१३ रोजी व मिळकत पत्रिकेवर दि. २९/८/२०१६ रोजी पुणे महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेत आलेल्या ३० मी.डी.पी.रस्त्याचे ८५४१.७७ चौ.मी. क्षेत्राची तडजोडीने टि.डी.आर./एफ.एस.आय.पोटी मोबदला देण्यात येणार असल्याने सदर मिळकतीमधील जागेचा भूसंपादनाचा उद्देश पुर्ण झालेला आहे. त्यानुसार सदर मिळकत भूसंपादन प्रकरणातून कायमस्वरुपी वगळणेबाबत मान्यता मिळणेस व मान्यतेप्रमाणे मा.जिल्हाधिकारी, पुणे व विशेष भूमिसंपादन अधिकारी क्र. १६ पुणे यांना कळविणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/६०८ दि. ३/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १८११
मा.शंकर केमसे,सभागृह नेते व मा. सचिन दोडके यांचे दि.१५/१०/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.३० ब येथील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.३.५ कोटीचे वर्गीकरण करणेस मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक CE20A1263/A-16 यादी क्र.ए-१६ पान क्र.१९३,अ.क्र.४ शहरामध्ये बी. आर. टी. मार्ग विकसित करणे | ३.५० कोटी | --- |
| **<u>नविन सुचविलेली कामे</u>** | | |
| १) प्रभाग क्र.३० ब येथील डी.पी.रस्ते विकसित व सुशोभिकरण करणे. | --- | १ कोटी |
| २)प्रभाग क्र.३० ब येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट स्टेडियमची उर्वरित कामे करणे. | --- | १ कोटी |
| ३) प्रभाग क्र.३० ब मध्ये उदयान विभागामार्फत विकासाची कामे करणे | --- | ५० लाख |
| ४) प्रभाग क्र.३० ब मध्ये विदयुत विषयक विविध कामे करणे | --- | ५० लाख |
| ५) प्रभाग क्र.१० ब भाजी मंडई उर्वरित काम करणे करिता | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८१२**

Carrying out refurbishment(civil & Electromechanical ) & O & M work for the period of five years at 3 TPD Biomethanation plant (to process segretated organic Bio degreadable municipal solid wastes)installed at Ghole road pune या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे.मेलहेम इंजिनिअर्स प्रा.लि. यांचे आवश्यक्तेनुसार १. Civil work चा खर्च र.रू. २१,४३,८७५/- २. Electromechanical work चा खर्च र.रु.८,७०,६१०/- व ३. Operation & maintainence work चा खर्च र.रु.४२,७३,५७०/- असे एकूण खर्च र.रु.७२,८८,०५५/- सर्व करांसहित त्यांचेकडून काम करुन घेणेस व त्यांचेशी त्यापोटी करार करण्यास व त्यानुसार रक्कम अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/ घनकचरा /७१६,दि.१५/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८१३**
मा.अविनाश बागवे व मा.ॲड्.रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम यांचे दि.४/१०/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. २५ ब मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, पान क्र. १९८, नवीन सिग्नल बसविणे व जुने सिग्नल दुरुस्त करणे, यादी क्र. एसटी३, सीई२०बी१०४/एसटी३-२, पुणे शहरातील वाहतुक शिस्तीसाठी ट्रॅफिक चॅनेलायझिंग, झेब्रा क्रॉसिंग, डिव्हायडर, सिग्नल सिंक्रोनायझेशन इत्यादी तदनुषंगिक कामे करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २५ ब मध्ये विविध विकास कामे करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८१४**

मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.४/१०/२०१६ चे पत्र.

खालील विविध ठिकाणी विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ७.३० कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अ.क्र.** | **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, १८ सांस्कृतिक केंद्र पान क्र.११२, अ.क्र. १६, शहरामध्ये स्मारके उभारणे, (यादी क्र. जे.-२६,) पान क्र. २३७ अ.क्र.६ कोथरुड येथे शिवसृष्टी उभारणे.( बजेट कोड सीई२८ए१९६+). | ७ कोटी ३० लाख | --- |
| **अ.क्र.** | **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १ | पुणे महानगरपालिका नव्याने समाविष्ट झालेल्या येवलेवाडी येथे विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे. | --- | ४० लाख |
| २ | पुणे महानगरपालिका नव्याने समाविष्ट झालेल्या येवलेवाडी येथील विद्यशिला शाळेकडे जाणारा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | --- | ४० लाख |
| ३ | गंगाधाम ते व्ही.आय.टी. हॉस्टेल चौक ते शंत्रुजय चौक दरम्यान डी.पी. रस्ता विकसित करणे. | --- | ३ कोटी |
| ४ | प्रभाग क्र. ६२ ब स.नं. ५६ येथे नव्याने वाहनतळ विकसित करणे. | --- | ५० लाख |
| ५ | प्रभाग क्र. ६२ ब कोंढवा स्मशानभूमी ते येवलेवाडी स्मशान भूमी मुख्य मलवाहिनी विकसित करणे. | --- | ३ कोटी |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८१५**

मा.सौ.चंचला कोद्रे व मा.चेतन तुपे यांचे दि.१०/१०/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. २० अ हडपसर शुटींग रेंज स्थापत्य विषयक विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, बजेट कोड सीई२०अे१०३/अे१३-१११, पान क्र. १७९, पुणे शहरामध्ये पादचाऱ्यांाठी वर्दळ असणारे व अतिमहत्वाच्या रस्त्यांवर पादचाऱ्यांसाठी उच्च दर्जाचे अडथळा विरहीत व इतर अनुषंगिक कामे करणे | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २० अ हडपसर शुटींग रेंज स्थापत्य विषयक विविध विकास कामे करणे | --- | २५ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८१६**

मे. महाराष्ट्र शासनाच्या नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५ अंतर्गत पुणे शहरातील माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना (जकात) स्थानिक संस्था करातून माफी देणेबाबत मे. राज्य शासनाने मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्रमांक ७ मधील शासन निर्णय क्रमांक आयटीपी-२०१३/(प्र. क्र. २६५)/ उद्योग-२, दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ नुसार माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना जकात/प्रवेशकर/एलबीटी यामधून सूट देण्याबाबत 'नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५' जाहीर केले असून त्या धोरणानुसार माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना स्थानिक संस्था करामधून सूट देण्याबाबत मे. राज्य शासनाकडून वारंवार विचारणा होत असल्याने माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना स्थानिक संस्था करामधून सूट देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/स्थासंक/६५८ दि. ७/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८१७**

पुणे शहरातील पादचारी क्रॉसिंगचा पूरेपूर वापर होणेसाठी व तो न होणेची कारणे जाणून घेणेसाठी '' द वॉक स्मार्ट अॅवॉर्ड '' स्पर्धा आयोजित करणेस तसेच या स्पर्धेत पुणे शहरातील विविध आर्किटेक्चरल महाविद्यालये व सल्लागार संस्था यांना सहभागी करून घेणेस व उत्तम डिझाईनचे सादरीकरण करणाऱ्या स्पर्धकांस प्रथम , द्वितीय,

तृतीय व दोन उत्तेजनार्थ बक्षिसे देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/६७० दि.१३/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८१८**

पुणे शहर शून्य कचरा प्रणाली प्रकल्प २० प्रभागांमध्ये राबविण्यासाठी मे.जनवाणी संस्था यांनी दाखल केलेल्या स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्तावानुसार त्यांचेकडून एकूण २० प्रभागांसाठी र.रुपये १,६३,५०,०००/- (अक्षरी एक कोटी त्रेसष्ट लाख पन्नास हजार फक्त) या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व मे.जनवाणी संस्थे समवेत सामंजस्य करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/६७२ दि.१३/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८१९**

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील सन २०१६ -१७ चे 'क ' अंदाजपत्रकातील महसूली भांडवली कामातील शिल्लक रक्कमेतून अनुक्रमे र. रू. ११९०=०० लक्ष व र. रू. ७००=०० लक्ष असे एकूण र. रू. १८९०=०० वर्गीकरणाने उपलब्ध करून मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त ( वि ) यांचे जा. क्र. मआ/पापुवमलनि/७०२, दि. १५/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८२०**

पुणे महानगरपालिकेच्या विविध जलकेंद्रामध्ये मैलापाणी शुध्दीकरण केंद्रामध्ये 900 के. जी कंटेनर्समध्ये द्रवरुप क्लोरीन वायु (IS646:1986) मेक-SRAAC/GACL/ ग्रासिम /NRC / HOC / MFL पुरविणेचे मान्य टेंडर परिमाणापेक्षा 50 % जादा परिमाण खरेदीसाठी खालीलप्रमाणे मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पापु/703,दि. 15/10/2016 चे पत्र.

1. टेंडर क्र.617/2015 चे पुरवठादार यांच्याकडून 900 के.जी कंटेनर्समध्ये द्रवरुप क्लोरीन वायु (IS646:1986 ) मेक-SRAAC/GACL/ ग्रासिम/NRC/HOC/MFL पुरविणे या कामी टेंडरचे 50 % वाढीव परिमाण म्हणजे पुरवठादार मे.रंगरसायन यांच्याकडून 464.13 मे.टन र.रु.40,84,344/- पर्यत मे.जी.एस.कमर्शियल कॉर्पोरेशन 154.71 मे.टन र.रु.13,61,448/- पर्यत व मे.आयडीयल केमिकल्स (इं) प्रा.लि. 154.71 मे.टन र.रु.13,61,448/- पर्यत मान्य टेंडर दर र.रु.8800/- प्रति मे.टन सर्वकरांसह र.रु.68,07,240/- पर्यत (आड्डसष्ठ लाख सात हजार दोनशे चाळीस रुपये फक्त) अधिक पुर्वीची मान्य रक्कम रु.1,36,14,480/- असे एकूण रक्कम रु.2,04,21,720/- पर्यंत खरेदी करणेस,
2. वरील क्रमांक 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे 50% वाढीव परीमाणाच्या खरेदीसाठी पुरवठादार मे.रंगरसायन, मे.जी.एस.कमर्शियल व मे.आयडीयल केमिकल्स यांच्याशी करारनामा करणेस,
3. खरेदी केलेल्या परिमाणाचे बिल पुरवठादारास अदा करणेस,

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८२१**

पुणे मनपाच्या पाणीपुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड द्रावण (is15573:2005 नुसार) मेक-(ग्रासिम/GACL/ अर्किल) पुरविणेचे मान्य टेंडर परिमाणापेक्षा 50 % जादा परिमाण खरेदीसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ-पापु-706, दि. 15.10.2016 चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८२२**

पुणे शहरात मोबाईल/ओएफसी धारक केबल कंपन्यांना दिलेल्या रस्ते खोदाईची लांबी व प्रत्यक्षातील खोदाईची लांबी याबाबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन खातरजमा करणे व त्याबाबतचा अहवाल पुणे महानगरपालिकेकडे सादर करणेसाठी कामाची तपासणी त्रयस्थ संस्था भारतीय प्रादयोगिक संस्थांन, मुंबई (आय.आय.टी.मुंबई) यांचेकडून करुन घेणेस त्यांना रक्कम रुपये १२,८०,०००/– (रुपये बारा लक्ष ऐंशी हजार फक्त) अधिक सर्व्हिस टॅक्स १४% अधिक स्वच्छ भारत कर ०.५% अधिक कृषी कल्याण कर ०.५% अशी एकुण रुपये १४,७२,०००/– (रुपये चौदा लक्ष बहात्तर हजार फक्त) आगाऊ अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/७४४, दि.२९/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८२३**

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा १०० कोटी इतका हिस्सा 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' यांना अदा करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ(वि)/७४५ दि.५/११/२०१६ चे पत्र.

१)मे.केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे वित्तीय वर्ष सन २०१५–१६ व सन २०१६–१७ या दोन वर्षासाठी र.रुपये १०० कोटी इतकी रक्कम खालील अर्थशिर्षकावरुन 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' ला अदा करणेस अर्थशिर्षक आरई६४अे१०१, यावरती ज.ने.रा.श.पु.अ., अमृत व स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत मनपाचा हिस्सा, तरतुद र.रुपये १,१७,९७,३१,७००/–

२) 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' यांचे नावे धनादेश/धनाकर्ष काढणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८२४**

श्री.कुणाल कुमार, भा.प्र.से. महापालिका आयुक्त दि. १५ ते १७ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत बार्सिलोना, स्पेन येथे आयोजित केलेल्या "Make in India Pavilion-Smart Expo World Congress-Conference & Exhibition 2016" या कार्यशाळेस उपस्थित राहत असल्याबाबतची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उआ/साप्र/७५२ दि.१५/११/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २९/११/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १८२५**

पुणे महानगरपालिकेचे अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडील संकीर्ण बजेट RE25B103 वर पुरेशी तरतुद शिल्लक नसल्याने खालीलप्रमाणे र.रुपये ८ लाख वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र.मआ/अतिक्रमण/८०१ दि.२८/११/२०१६ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–२०१७ चे अंदाजपत्रक, उप आयुक्त, अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग RE25B108 हॉकर्स सर्वेक्षण व अतिक्रमण नविन सुचविलेले काम | ८ लाख | --- |
| सन २०१६–२०१७ चे अंदाजपत्रक, उप आयुक्त, अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग RE25B103 संकीर्ण | --- | ८ लाख |

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**